**<u>महाकृषि ऊर्जा अभियान - प्रधानमंत्री कुसुम योजना सद्य:स्थिती</u>**

महाकृषि ऊर्जा अभियान - प्रधानमंत्री कुसुम योजनेअंतर्गत १००००० सौर पंपांची योजना सुरु झाली आहे. यासाठी केंद्र शासनाकडून अद्याप पुरवठादार कंपन्या व दर अंतिम झालेले नाहीत, त्यास एक महिना कालावधी लागण्याची शक्यता आहे (नोव्हेंबर, २०२१ अखेर). दरम्यान केंद्र शासनाचे सुचनेप्रमाणे मागील वर्षाचे पुरवठादार, मागील वर्षाचे दराने सौर पंप पुरविणेस तयार असतील अशा पुरवठादारांकडून देकार मागवून २७५० सौर पंपासाठी प्रथम आलेल्या अर्जदारास प्राधान्य देऊन त्याची कार्यवाही सुरु आहे.

दि. २६ ऑक्टोबर, २०२१ रोजी पर्यंत १८४३०६ लाभार्थी शेतकऱ्यांनी पोर्टलवर प्राथमिक नोंदणी केली आहे. यापैकी सुमारे ८६६६६ लाभार्थींनी सर्व आवश्यक कागदपत्रांसह नोंदणी पूर्ण केली आहे. यामुळे जालना, बीड, परभणी, औरंगाबाद, उस्मानाबाद, हिंगोली, बुलढाणा, जळगांव, अहमदनगर, लातूर आणि नांदेड या जिल्ह्यांमध्ये निश्चित केलेल्या उद्दिष्टाच्या दुप्पट संख्येचे परिपूर्ण अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यामुळे अशा जिल्ह्यांमध्ये सद्य:स्थितीत लाभार्थी शेतकऱ्यांची नोंदणी बंद करण्यात आली आहे.

केंद्र शासनाकडून या वर्षीचे पुरवठादार कंपन्या व दर आलेनंतरच या पुरवठादारांना जिल्हानिहाय कोटा वाटप केल्यानंतर योजनेची अपेक्षित कार्यवाही सुरु होईल.

सद्य:स्थितीत होणाऱ्या विलंबा बाबत दिलगीर आहोत.

महाऊर्जा/ मेडा